सकाळ
शनिवार, ७ मार्च २०१५

## विद्युल्लता छायाचित्र प्रदर्शन

फोटो सर्कल सोसायटी व ठाणे महापालिकेतर्फे शुक्रवार (ता. ६) पासून रविवार (ता. ८) पर्यंत ठाणे कलाभवन येथे फोटो सर्कल सोसायटीच्या ११ महिलांनी काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. जव्हारमधील ज्येष्ठ समाजसेविका प्रमिला कोकड या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शनिवारी व रविवारी सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे.

सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा व त्यांच्या कार्याचा आढावा घेणारी अनेक छायाचित्रे या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहेत. ठाण्यातील फोटो सर्कल सोसायटीच्या निवेदिता भार्गवे, स्वप्नाली मटकर, संघमित्रा बेंडखळे, वेदवती पडवळ, रेखा भिवंडीकर, नंदिनी बोरकर, गार्गी गीध, स्नेहा गोरे, अस्मिता माने यांनी काढलेली छायाचित्रे या प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत.